# भूगोल सहामाही प्रश्नपत्रिका
## XI First Term Geography Question Paper,

प्रथमसत्र प्रश्नपत्रिका -

इयत्ता अकरावी

**विषय- भूगोल**

गुण - 50 वेळ- 2.30 तास

**सुचना-**

1 सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

2 प्रश्नांची उत्तरे लिहीतांना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे

3 रंगीत पेंन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहेत.

4 नकाशा स्टेंसिलचा वापर योग्य तेथे करावा.

5 उजवी कडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

6 आलेख पुरवणी व नकाशा पुरवणी मूळ उत्तर पत्रिकेस जोडावी.

**प्रश्न 1अ ) खालील 'अ 'ब' आणि 'क स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावुन साखळी पूर्ण करा.** (गुण 4)

| अ | ब | क |
|---|---|---|
| **वर्षभर पाऊस** | बिळात राहणारे प्राणी | पुळण |
| **जैविक विदारण** | वर्षावने | ज्वालामुखी |
| **सागरी लाटा** | भूकंप | विषववृत्तीय प्रदेश |

| | | |
|---|---|---|
| **शीघ्र हालचाली** | कमान | वनस्पतींचे मुळ |

**प्रश्न 1 ब) योग्य पर्याय निवडा** **(गुण 3)**

1) एक वळी दुसऱ्या वळीवर क्षितीज समांतर विसावणे

अ) असममित वळी ब) उलथलेली वळी

क) सममित वळी ड) आडवी वळी

2) पाण्यात क्षार विरघळण्याची क्रिया

अ) भस्मिकरण ब) कार्बनीकरण

क) द्रावीकरण ड) ऑक्सिडेशन

3) नदीच्या संचयन कार्यातील एक भूरूप

अ) घळई ब) नालाकृती सरोवर

क) पूरमैदान ड) पूरतट

**प्रश्न 1 क) पुढील विधाने सुचनेनुसार पूर्ण करा.** **(गुण 3)**

**1) खालील वाळवंटी प्रदेशांचा त्यांच्या स्थानानुसार पूर्वेकडून पश्चिमेकडे क्रम लावा.**

अ) सहारा

ब) अटाकामा

क) अरेबीयन

ड) गोबी

**2) खडकातील भेगांमध्ये पाणी किंवा हिम गेल्याने ते कमकुवत होतात यावरुन हिमनदी गेल्यास तळाकडील खडक ओढला जातो. ही प्रकीया कोणती. ----**

अ) उखड

ब) अपघर्षण

क) सन्निघर्षण

ड) वहन

**3) गोढण वितळण प्रकीयेचे टप्पे योग्य क्रमाने लावा.**

अ) खडकांचे तुकडे पडणे

ब) भेगा रुंदावणे

क) बर्फात रुपांतर होणे

ड) खडकांच्या भेगात पाणी शिरणे

**प्रश्न 1 ड) अचूक सहसंबध ओळखा** **(गुण 3)**

**A: विधान**

**R: कारण**

**1 )**

A : पृष्ठीय जल मातलोट प्रक्रियेस सहाय्य करते.

R : भूजल पातळी ही त्यास कारणीभूत ठरते.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**2)**

A : टुंड्रा प्रदेशात वर्षभर बर्फाळ वातावरण असते.

R : येथे सूर्य किरणे तिरपी पडतात

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**3)**

A : मृदू खडकांना वळया पडतात

R : मृदूता व लवचिकतेमुळे ते तूटत नाहीत.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**प्रश्न 2 रा) भौगोलिक कारणे दया (कोणतेही 3)** **(गुण 9)**

1) भस्मिकरणामुळे खडकांचा आकार आणि रंग बदलतो.
2) भूजलामुळे तयार होणाऱ्या भूरुपांना "कार्स्ट भूरूपे" असेही म्हणतात.
3) पर्वतीय प्रदेशात नदया घळई व व्ही आकाराची दरी या भूरूपांची निर्मिती करते
4) मानव हा विदारणाचा एक कारक आहे.
5) वांळवटी प्रदेशात दैनिक तापमान कक्षा जास्त असते.

**प्रश्न 3 रा) फरक स्पष्ट करा (कोणतेही -3)** **(गुण 9)**

1) मौसमी हवामान प्रदेश आणि भूमध्य सागरी हवामान प्रदेश
2) ऊर्ध्वमुखी लवणस्तंभ आणि अधोमुखी लवणस्तंभ
3) विदारण आणि अपक्षण
4) पुरतट आणि पुरमैदान
5) मर्केली प्रमाण आणि रिश्टर प्रमाण

**प्रश्न 4 था) जगाच्या नकाशात घटक योग्य चिन्ह व सूचिच्या सहाय्याने दर्शवा (कोणतेही- 5)** **(गुण 5)**

1) मोसमी हवामानाचा एक देश
2) अफ्रिकाखंडातील वाळवंटी प्रदेश
3) ग्रीनलँड
4) टुंड्रा हवामान प्रदेश
5) सॅव्हाना गवताळ प्रदेश
6) स्कॉशिया भूपट्ट
7) ब्राझील

**प्रश्न 5 वा) टिपा लिहा (कोणत्याही -2)** **(गुण 8)**

1) विभंगाचे प्रकार
2) भूकंप छायेचा प्रदेश
3) विषववृत्तीय हवामान प्रदेश
4) नदीचे संचयन कार्य

**प्रश्न 6 अ ) खालील उताऱ्याचे वाचन करुन विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा** **(गुण 4)**

*भारत हा उष्णकटीबंधीय देश आहे. संपूर्ण भारताभोवती समुद्रकिनारा नाही. एकीकडे हिमालय आहे. तर दुसरीकडे समुद्रकिनारा त्यामुळे या घटकांचा परिणाम भारतातील हवामानाच्या अंदाजावरही होतो. आपल्याकडे पावसाचा अंदाज म्हणजे जमिनीवरील हवा गरम होणे, त्यात बाष्पाचे प्रमाण, हे बाष्प वर जाऊन थंड होणे आणि त्यानंतर वादळी वारे आणि ढग अशा पद्धतीने पाऊस येतो यावर अवलंबुन आहे. यामध्ये एवढी अचूकता नसते. यामध्ये विभागवार, राज्यवार पूर्वानुमान वर्तवता येते. पण हे अंदाज व्यापक भागासाठी लागू असतात. यात प्रादेशिक अचूकता मांडता येत नाही. यासंदर्भात हवामानतज्ज्ञ आणि इंडियन*

*मेटरोलॉजिकल सोसायटी, पुणे या संस्थेचे अध्यक्ष डॉ. जी. आर. कुलकर्णी सांगतात की, परदेशात अचूक पूर्वानुमान देण्यासाठी वापरली जाणारी जगातील सगळी मॉडेल्स वापरून तीन-तीन तासांचे अंदाज घेतात तयानुसार आपल्यालाही भारतासाठी पूर्वानुमानसुद्धा आपल्यालाही देता येते. मात्र या पूर्वानुमानामध्ये काही प्रमाणात चूक असतेच. भारतीय मौसमी हवामानाची प्रक्रिया गुंतागुंतीची असल्याने परदेशाप्रमाणे अचूकता येत नाही. मात्र एखादा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला तर विस्तृत प्रमाणात पाऊस पडतो आणि वर्तवलेले बऱ्यापैकी अंदाज योग्य ठरू शकतात.*

1) भारतात पाऊस पडणाऱ्या प्रकीयेचा अंदाज कसा घेतला जातो. ?

2) आपल्या देशातील हवामानाचे अंदाज कोणत्या कारणांमुळे / अभावामुळे 100% खरे ठरत नाहीत ?

3) पावसाचा अंदाज कोणत्या परीस्थीतीत योग्य ठरु शकतो.?

4) उताऱ्यात आलेली भारताची हवामानीय भौगोलीक परीस्थीती कोणती?

**प्रश्न 6 ब) खालील पैकी कोणत्याही एका घटकांची सुबक आकृती काढून भागांना नावे दया.**

**(गुण 2)**

1) धबधबे व प्रपात गर्ता

2) भूछत्र खडक

प्रा. मनोज देशमुख
राष्ट्रीय ज्युनियर कॉलेज चाळीसगाव.
9421680541